नि.दि.दावा क्र. ५२८/२०१७
अंजनाबाई व इतर वि. लक्ष्मण व इतर
निशाणी क्र. २७

निशाणी क्र. २७ खालील आदेशः-

**CNR No.MHLA140013472017**

प्रस्तुत अर्ज वादीने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे करजगांव, ता.औसा, जि. लातूर येथील गट क्र. ४१४ मधील क्षेत्र ४ हे. ७३ आर पोटखराब १ आर पैकी वादी क्र.१ च्या नावे २ हे. ५२ आर., वादी क्र. २ च्या नावे १ हे. ०८ आर., वादी क्र. ३ च्या नावे १ हे. १४ आर. व गट क्र. ४१३ मधील क्षेत्र १ हे. ८० आर. पोटखराब क्षेत्र ०१ आर या वादींच्या वाद मिळकतीचे निरीक्षण/मोजणी करुन नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक होण्यासाठी केला आहे. अर्जावरील प्रतिवादींनी नि.क्र. ३१ वर दिलेले लेखी म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

२. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये भावकी संबंध आहेत. प्रतिवादींची जमीन वादींच्या जमीनीच्या उत्तर बाजुस आहे व त्यांच्या जमीनीमध्ये १० फुट रुंदीचा बांध होता जो की प्रतिवादींनी दरवर्षी थोडाथोडा करुन संपुष्टात आणला आहे. त्यामुळे सध्या दोघांच्या जमीनीमध्ये काही ठिकाण बांध आहे, तर काही ठिकाणी बांध नाही. अशाप्रकारे प्रतिवादींनी वादीच्या जमीनीवर अतिक्रमण केले आहे व अतिक्रमण करणे सुरु ठेवले आहे. वादींनी असे न करण्याची विनंती केली असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला. म्हणून वादींनी सदर दावा मालकी हक्क जाहिर करुन कायमचा मनाई हुकूम व उपअधिक्षक भुमी अभिलेख औसा यांच्याद्वारे जमीनीची मोजणी होवून मिळणेकामी केला आहे. तसेच प्रतिवादी हे जाण्या येण्याच्या रस्त्यावर शेड मारुन, दगडे टाकुन व काटेरी झुडपे लावून वादीला येणे–जाणेसाठी अडथळा करित आहेत. म्हणून वादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुत अर्जावर निशाणी क्र. ३१ वर लेखी

म्हणणे दाखल करुन कथन केले की, वादींनी त्यांच्या अर्जात केलेले सर्व कथने खोटे व काल्पनीक आहेत व त्यास प्रतिवादींनी स्पष्ट नकार दिला आहे. यापुर्वीही वादींनी मोजणी अर्ज दाखल केला होता व तो नामंजुर झाला आहे. वादींनचे व प्रतिवादींचे पुर्वापर एकमेकांच्या क्षेत्रफळावरुन वाद आहे. तसेच वादी हा प्रकरणाचा न्याय होण्यास विलंब करत आहे. तसेच सदर मिळकतीमधील इतर पोट हिस्सेदारांना वादीने दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील केले नाही. सबब वादींचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. अतिक्रमण दुर करण्याच्या दाव्यात उभयतांना मान्य नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने त्यांच्या मिळकतीची मोजणी होऊन नकाशा व अहवाल मिळविण्याची मागणी केली आहे. वादीचा आणि प्रतिवादींचा वाद मिळकतीबाबत वाद आहे असे दिसते. म्हणुन तज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करुन मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद संपणार नाही असे दिसते.

६. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आक्षेप घेतलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप लक्षात घेता दावा मिळकतींची मोजणी झाल्यास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यासाठी वादीने आयुक्ताचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज **निशाणी क्र. २७** मंजूर करण्यात येतो.

२. **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ९ सह वाचणीय कलम ७५ (ब)** नुसार उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे करजगांव ता. औसा, जि. लातूर येथील ४१४ मधील क्षेत्र ४ हे.

७३ आर पोटखराब १ आर मधील वादी क्र.१ च्या नावे २ हे. ५२ आर., वादी क्र. २ च्या नावे १ हे. ०८ आर., वादी क्र. ३ च्या नावे १ हे. १४ आर. व गट क्र. ४१३ मधील क्षेत्र १ हे. ८० आर पोटखराब क्षेत्र ०१ आर या जमीनींची मोजणी करुन, अतिक्रमण असल्यास ते दर्शवुन, हद्दी, बांध, खुणा यांचा स्पष्ट उल्लेख करुन आयुक्तास पत्र मिळाल्यापासुन २ महिन्याच्या आत नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणुक करण्यात येते.

३. वादींनी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांच्या कार्यालयात त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादींनी ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसुल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

५. आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी प्रक्रिया नियमावलीतील प्रकरण क्र.८ परिच्छेद १५१ ते १७० व महसुल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्ताचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवुन दिलेल्या मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागु शकतात.

६. उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन

आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

७. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते. वादीला वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे आकलन होण्यासाठी देण्याचे निर्देशत करण्यात येते.

८. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पुर्ण करावे.

९. वादींनी आदेश कलम ३, ४ आणि ७ ची पुर्तता तात्काळ करावी.

१०. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2023.07.05 17:26:10 +0530

औसा. **(पी.डी. कोळेकर)**

दिनांकः– ०५/०७/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, औसा.

जिल्हा लातूर